**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Address - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.७३६ दि.१५/०४/२०२०**

**खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक,(पश्चिम ),गुन्हे शाखा,पुणे शहर**

**खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक,(पश्चिम ) कडुन लॉकडाऊन काळात सिगारेट विक्री करणा-या व्यापा-याकडुन ३९ लाखाची सिगारेट जप्त.**

मा.पोलीस आयुक्त सो, मा.पोलीस सह-आयुक्त सो यांनी लॉक डाऊनचे काळात जिवनावश्यक वस्तु व्यतीरीक्त कोणी सिगारेट, तंबाखु व इतर अमंली पदार्थ विक्री करीत असेल तर त्यांचेवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने आज दिनांक १५/०४/२०२० रोजी खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस उप निरीक्षक निलेशकुमार महाडीक यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, चमाडीया ट्रेडलींग-मार्केटयार्ड,पुणे येथे जीवनावश्यक वस्तु बरोबरच सिगारेटची देखील विक्री सुरु आहे. सदर दुकानात एक बनावट ग्राहक पाठवुन खात्री करता सदर दुकानदार जीवनावश्यक वस्तु बरोबरच सिगारेटची देखील विक्री करीत असल्याचे दिसुन आल्याने सदर दुकाना मध्ये पंचासह छापा घालुन, दुकान मालक शशीकांत रामस्वरुप चमाडीया वय ४३ रा. कोरेगावपार्क,पुणे यांचे दुकानातुन एकुण ३७ सिगारेटचे बॉक्स असा एकुण ३९,००,०००/-(एकोणचाळीस लाख रुपयांचा) माल पकडुन तो जप्त करुन त्याचे विरुध्द मार्केटयार्ड पो.स्टे. येथे भा.द.वि.क. १८८,२६९,२७०,२७३ व राष्ट्रीय व्यवस्थापन कायदा कलम ५१ (ब) महाराष्ट्र कोवीड १९ उपाय योजना कलम २०२० चे कलम ११, संसर्गजन्य रोग अधिनियम १८५७ अधिनियम कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त मा.श्री.अशोक मोराळे साो.,मा.पोलीस उप आयुक्त श्री.बच्चनसिंह साो. सहा.पोलीस आयुक्त डॉ.श्री.शिवाजी पवार साो.यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उप निरी.निलेशकुमार महाडीक,संजय गायकवाड, पोलीस कर्मचारी एकनाथ कंधारे,पांडुरग वांजळे,हनुमंत गायकवाड, विजय गुरव, सुनिल चिखले, यांनी केली आहे.